# स्थावर मालमत्तेचे विक्रीपत्र

## सब रजिस्ट्रार नोंदणी कार्यालय, हिंगणा,

तह. हिंगणा, जि. नागपूर.

बाजार भाव रू. 10,08,000/-

विक्रीमुल्य रू. 15,00,000/-

मुद्रांक शुल्क रू.1,20,000/-

नोंदणी शुल्क रू.20,000/-

**(Property of Mauza : Waddhamna, P.H.No. 6, Kh.No.256/1,2, Plot No.26, Area 94.50sq.mtr., Tah.Hingna, Dist. Nagpur, Item No.4.41 @ Rs.6490/- Sq.Mtrs., on Page No. 2237)**

---

लिहून घेणार : श्री शैलेंद्र किसनलाल सोनटक्के
वय : 43, धंदा : खाजगी,
आधार नं. 7849 2934 7627,
पॅन नं. GZWPS9184N
रा. वार्ड न.1, अमर नगर, निलडोह, हिंगणा रोड, नागपूर – 44001

लिहून देणार : बिसेन्द्र गणपत पटले
वय : 43 वर्ष, धंदा : खाजगी
आधार नं.4797 8894 8728,
पॅन नं.BNDPP9615B
रा. प्लॉट नं.1064/ए/29, प्रभु नगर, जयताळा, नागपूर–440036

ईसवी सन 2026 साल कारणे विक्रीपत्र लिहुन देण्यात येते की, माझ्या मालकी कब्जात असलेली सदरची मालमत्ता एम आर इन्फ्रा पेवर्स प्रा.लि. तर्फे डायरेकटर राजेश किशोर बोदेले यांचा कडुन दस्त क्र.11752, दि.28/11/2025 रोजी दुय्यम निबंधक हिंगणा येथे नोंदणी करून खरेदी केलेला आहे.

आज रोजी माझ्या अधिकारात व वहिवाटीत असलेला तसेच आज रोजी सरकारी रेकॉर्डवर माझ्या नावांनी दर्ज असलेला खालील वर्णनांचा स्थावर प्लॉट तुम्हांस **रू.** 15,00,000/— (अक्षरी रूपये **पंधरा** लाख फक्त) मध्ये आज रोजी हमेशाचे मालकी हक्काने व अधिकाराने या विक्रीपत्रा व्दारे विकला असून विक्रीची सम्पुर्ण मोबदला रक्कम **रू.** 15,00,000/— ( अक्षरी रूपये **पंधरा** लाख फक्त) मी तुमचे पासुन विक्रीपत्र नोंदणी प्रंसगी खालील प्रमाणे घेतलेली आहे.

| | |
|---|---|
| 1) रू.11,000/— | दि. 12/07/2026 रोजी आनलाईन फोनपे ट्रान्साक्शन आयडी नं.------------------------, बॅक ....... अन्वये लिहुण देणार यांना मिळालेले आहे हे मला मान्य व कबुल आहे. |
| 2) रू.2,39,000/— | दि. 22/07/2026 रोजी आरटीजीएस युटीआर नं. UBINR2203607220116689, अन्वये लिहुण देणार यांना मिळालेले आहे हे मला मान्य व कबुल आहे.. |
| 3) रू.1,50,000/— | दि. 15/09/2026 रोजी आरटीजीएस युटीआर नं. UBINN52026091567503845, अन्वये लिहुण देणार यांना मिळालेले आहे हे मला मान्य व कबुल आहे.. |
| 4) रू.11,00,000/— | (अक्षरी रूपये अकरा लाख फक्त) लिहुण घेणार यांनी पीएनबी फायनान लि. यांचा कडुन घेतलेल्या गृह कर्जा अन्वये अंतीम मोबदला विक्रीपत्र नोंदणी प्रसंगी लिहुण देणार श्री बिसेन्द्र गणपत पटले यांना प्राप्त झोलेला आहे, हे मला मान्य व कबुल आहे. |
| रू.15,00,000/— | (अक्षरी रुपये **पंधरा** लाख फक्त) पुर्ण मोबदला |

मोबदल्याची संम्पुर्ण रक्कम रू. 15,00,000/— (अक्षरी रूपये **पंधरा** लाख फक्त) मला मिळालेली असुन सब रजिस्ट्रार साहेब नोंदणी कार्यालय हिंगणा यांच्या समक्ष कोनताही मोबदला घेणे बाकी नाही.

: विकलेल्या स्थावर मालमत्तेचे चे वर्णन :

मौजा : वडधामना, प.ह.न.6, खसरा नं.256/1, 256/2, मध्ये टाकलेल्या निवासी लेआऊट राधीका विहार क्रिष्णा वाटीका मधील स्थावर **प्लॉट क्र. 26, क्षेत्रफळ 94.50 चौ.मी.** आहे. सदर मालमत्ता ग्रामपंचायत वडधामना मधील मालमत्ता क्र. आहे. तालुका हिंगणा, जिल्हा नागपुर, येथील हद्दीत आहे.

या प्लॉट ची चर्तु:सिमा खालील प्रमाणे

पुर्वेस :— 9 मी रूंदीचा रोड
पश्चिमेस :— प्लॉट नं.03
उत्तरेस :— प्लॉट नं.27
दक्षिणेस :— प्लॉट नं.25

येणे प्रमाणे चतु:सिमेच्या आतील मालमत्ता हमेशाचे मालकी हक्काने व अधिकाराने विकला असुन त्याचा मालकी कब्जा ताबा व मुळ दस्तही तुम्हांस आज रोजी दिलेले आहे.

सदरची मालमत्ता एनएमआरडी यांचे आदेश कार्यकारी इंजिनीयर/एनएमआरडीए/6658 दि.14/02/2022 अनव्ये अभिन्यास मंजुरी प्राप्त आहे. तसेच मा. जिल्हाधीकारी साहेब नागपूर यांचे आदेश कावी—723/2022, रा.म.क्र.195/एन.ए.पी.—34/मौजा—वाडधामना/हिंगणा /2021—22, दि.25/04/2022 अन्वये गैरकृषी निवासी प्रयोजनाकरीता मंजुरी प्राप्त आहे.

हा प्लॉट कोठे गहाण, कसल्याही प्रकारे थकित, अथवा ट्रान्सफर नसुन यावर आमचे शिवाय इतर नातेगोत्राचा इस्टेटवारसानांचा हक्क संबंध किंवा अधिकार नाही. पुढे चालुन याबाबत काही वाद किंवा भानगड आढळुन आल्यास त्याचे निवारण आम्ही आमचे इतर स्थावर मिळकतीतुन करून देऊ. तुम्हास हानी किंवा तोषिस खर्च लागु देणार नाही. या पुढील टॅक्स खरेदीदाराने भरायचा आहे.

उपरोक्त मिळकत खरेदी करतांना खरेदीदाराने हस्तांतरण कायदयाच्या कलम 41 नुसार संबंधित मिळकतीच्या मालकी संबंधी व विक्री करून देणार व घेणार यांनी मालमत्तेची खात्री करूनच सदर स्थावर मालमत्ता विकत घेतली आहे. लिहुन घेणार व लिहुन देणार ह्यांनी हस्तांतरीत केलेली मालमत्ता मोक्यावर मोजमाप करून ताब्यात घेतली आहे.

सरकारी व निमसरकारी कागदोपत्री तूम्ही तूमचे नाव दर्ज करून घ्यावे. आज पासुन या प्लॉट वर आमचे असलेले मालकी हक्क व अधिकार नष्ट झालेले आहे. करीता आज पासुन या प्लॉट चा तुम्ही तुमचे मर्जीप्रमाणे उपयोग, उपभोग व फायदा घेत जावा. तसेच पाहीजे तशी वहीवाट व विल्हेवाट करावी.

सदर मिळकत राज्य शासनाने अथवा केंद्र शासनाच्या कुठल्याही प्रस्तावीत योजनेत समाविष्ठ नाही, किंवा प्रस्तावित नाही. तसेच ही मालमत्ता शासनाच्या कोणत्याही प्रकल्पात अधीग्रहीत केलेली नाही किंवा अधीग्रहीत करण्याचा शासनाचा उद्देष नाही. सदर प्लॉट शासकीय/निमशासकीय मालकीची नसुन माझ्या स्वतःच्या मालकीचा आहे.

या मिळकतीवर कुठल्याही न्यायालयात, कुठल्याही कायदयाअंर्तगत अथवा मालकी हक्का संबंधी कुठलेही प्रकरण न्याय प्रविष्ठ नाही. किंवा कुठल्याही न्यायालयाच्या सदर मालमत्ता विकणे संबंधी स्थगनादेश नाही. किंवा कुठल्याही प्रकारे घेनेदेने बाकी नाही.

करीता हे विक्रीपत्र मी माझे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा अधिकार राखुन न ठेवता तुमचे अधिकारात राजीखुषीने व स्वसंताषाने व पुर्ण शुध्दीत असुन तुम्हास लिहून दिले. यावर वाचुन व समजावुन घेवुन खालील साक्षीदारा समक्ष मी माझी स्वाक्षरी केलेली असुन हे मला व माझ्या इतर इस्टेट वारसांनास लागु व बधंनकारक राहिल.

मसुदा तयार करणार ॲड.उमेश मेश्राम
फ.ता. 24 / 09 / 2026

विक्रीपत्र लिहून देणार

बिसेन्द्र गणपत पटले

विक्रीपत्र लिहून घेणार

श्री शैलेंद्र किसनलाल सोनटक्के

साक्षीदार :

1. सही : ..............................................
नाव : अशोक खेमराज भास्कर

2. सही : ————————————
नाव : रवी राधेश्याम बिजेवार